-: प्रेसनोट दिनांक - १२/११/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक १) रज्जाक हुसेन तांबोळी,वय ५०,पद -लाईनमन,मराविवि शाखा कार्यालय चंदुर,रा.हुसेन मंजील बंगला भारतनगर, इदगा जवळ गल्ली नं १,मिरज,ता.मिरज,जिल्हा सांगली, व २) आकाश शंकर किटे,वय ३३,पद-बाहयस्त्रोत कर्मचारी, ,मराविवि शाखा कार्यालय चंदुर,रा.धुळेश्वर नगर गल्ली नं ५ कबनुर,ता.हातकणंगले,जिल्हा कोल्हापुर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

यातील तक्रारदार हे इलेक्ट्रीक कॉन्ट्रॅक्टर असुन लाईट फिटींगचे तसेच ग्राहकांना इलेक्ट्रीक चे अनुशंगाने असलेली सर्व कामे मंजूर करण्याची कामे करतात तक्रारदार यांचे ग्राहक यांचे शाहुनगर चंदुर येथे पॉवरलुम सुरू करण्याचे असल्याने तक्रारदार यांचे वतीने त्यांचे ग्राहक यांनी महावितरण कार्यालय चंदुर येथे अर्ज केला होता तसेच कनेक्शन घेण्याकरीता आवश्यक कार्यालयीन बाबीची पुर्तता करणेरकीता ग्राहक यांचे सोबत करार करून सर्व कागदपत्रांची पुर्तता करून सदर २६ एचपीचे पॉवरलुम कनेक्शन मंजुर करून घेतले.व ग्राहक यांचे शेडमध्ये इलेक्ट्रीक पेटी,मिटर इत्यादी जोडलेले आह .सदर शेडमध्ये इलेक्ट्रीक पोलवरून मिटर मध्ये कनेक्शन जोडणे बाकी होते. त्याकरीता दिनांक ३०/१०/२०२४ रोजी तक्रारदार महावितरण चंदुर कार्यालयत जावून तेथे लाईनमन तांबोळी यांना भेटले त्यावेळी त्यांचे सोबत वायरमन आकाश किटे हे होते त्यांनी तक्रारदार यांना इलेक्ट्रीक पोलवरून मिटरपर्यंत लाईट जोडणी करून देतो.परंतु त्यासाठी ७०००/-रूपये तांबोळी मिस्त्रीचेकरीता दयावे लागतील नाहीतर कनेक्शन जोडणार नाहीत असे सांगीतले त्यावेळी तक्रारदार यांनी काहीतरी कमी करण्यास सांगीतले असता लाईनमन रज्जाक तांबोळी यांनी ५०००/-रूपये दया त्यानंतर कनेक्शन लगेच जोडतो असे त्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे दिलेली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तक्रारदार यांचे ग्राहक यांचे पॉवरलुमचे शेडमध्ये इलेक्ट्रीक पोलवरून मिटर मध्ये कनेक्शन जोडणे करीता बाहयस्त्रोत कर्मचारी आकाश किटे यांनी प्रथम ५०००/-रूपयामध्ये तडजोड करून ३०००/-रू लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले त्यानंतर लाईनमन रज्जाक हुसेन तांबोळी यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता सदर कामाकरीता रज्जाक हुसेन तांबोळी यांनी ५०००/-रूपयांची लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक १२.११.२०२४ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक १) रज्जाक हुसेन तांबोळी,वय ५०,पद -लाईनमन,मराविवि शाखा कार्यालय चंदुर,रा.हुसेन मंजील बंगला भारतनगर, इदगा जवळ गल्ली नं १,मिरज,ता.मिरज,जिल्हा सांगली,यांनी ५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले. सदर बाबबत आरोपी नं १ व २ यांचे विरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, इलचकरंजी जिल्हा कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती डॉ. शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे,श्रीमती वैष्णवी पाटील पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापुर यांचे मार्गदर्शनानुसार श्रीमती आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर, पो.हे.कॉ श्री अजय चव्हाण, सुनिल घोसाळकर, पो.ना. सुधीर पाटील,पोकॉ कृष्णात पाटील,चा.सहा.फौ गजानन कुराडे ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपससंपदे बाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) **मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
२) **मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
३) **श्री.वैष्णवी पाटील पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
४) **हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
५) **व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**